सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
पोलीस सह आयुक्त, आर्थिक गुन्हे, मुंबई यांचे कार्यालय
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार (नवीन इमारत),
तिसरा मजला, महात्मा फुले मंडई समोर
डॉ. दादाभाई.नौरोजी मार्ग, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्रमांक :- २२६२५०२८
Email ID - jtcp.eow@mahapolice.gov.in

का.आ.क्र : ३१ /पोसहआ/ आगुवि/२०२४ दिनांक- १५ / ०३ /२०२४

कार्यालयीन आदेश

आमच्या असे निदर्शनास आले आहे की, आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे येणारे अभ्यांगत हे आगु कार्यालयात येताना स्वागत कक्ष येथील नोंदवहीत स्वत:ची खोटी माहिती देत असतात. तरी सदरचे प्रक गंभीर असून ते टाळण्यासाठी, स्वागत कक्ष येथे कर्तव्यास असणाऱ्या अंमलदारांनी खालील प्रकारे काळ घ्यावी.

१. अभ्यांगत ज्या अधिकाऱ्यांना भेटावयास आले आहेत, त्यांच्या कडून सदर बाबत त्यांच्या जवळ आगुवि कार्यालयात बोलावल्याचे पत्र असल्यास ते पाहून अथवा संबंधित अधिकाऱ्यांकडे खात्री कर घ्यावी. संबंधित अधिकाऱ्यांनी भेटण्यास वेळ दिली नसल्यास अभ्यांगतांना कार्यालयात जाण्य परवानगी देवू नये.

२. अधिकाऱ्यांनी अभ्यांगतास बोलावले असल्यास आगुवि कार्यालयास भेटीस येणाऱ्या अभ्यांगतांची त्य ओळखपत्र पाहून त्यांची ओळख पटवून अभ्यांगत नोंदवहीत स्वच्छ अक्षरात नोंद करुन घ्यावी.

३. अभ्यांगतांच्या ओळखपत्राची माहिती, भ्रमणध्वनी क्रमांक, कार्यालयात येण्याची वेळ, र अधिकाऱ्यांना भेटावयाचे आहे त्यांचे नाव, अर्ज / प्रा.चौ. / गुन्हा यांबाबत नोंद घेवून त्या स अभ्यांगतांची स्वाक्षरी घेवून गरज असल्यास शेरा लिहावा.

४. वरिष्ठ कार्यालयास भेट देणाऱ्या अभ्यांगतांना वरिष्ठांनी भेटीची वेळ दिली असल्यास, पोलीस आयुक्त कार्यालयात स्वीय सहाय्यक / वाचक अधिकारी तसेच पोलीस उप आयुक्त कार्यालयात वा अधिकारी यांच्याकडून खात्री करुनच अभ्यांगतांना कार्यालयात जाण्याची परवानगी द्यावी.

यापुढे उपरोक्त बाबींसंदर्भात स्वागत कक्ष येथील कर्तव्यास असलेल्या पोलीस अंमलदार यांच्याक कसूरी झाल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची गांभीर्याने घ्यावी.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत
जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई
दिनांक २४/ ९ /२६

माहितीचा अधिकार

१५/३/२४

(निशीथ मिश्र)
पोलीस सह आयुक्त,
आर्थिक गुन्हे विभाग, बृहन्मुंबई

प्रति :-

सर्व कक्षाचे वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई.

प्रत माहितीकरीता.:-

CamScanner

महाराष्ट्र शासन
वरिष्ठ पोलीस निरीक्षक (प्रशासन)
आर्थिक गुन्हे विभाग यांचे कार्यालय,
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार,
क्रॉफर्ड मार्केट समोर, डॉ. दा.नौ.मार्ग, मुंबई ०१
दूरध्वनी - 91-22-22620787
[illegible]@mahapolice.gov.in

जा.क्र. १३०९ /आगुवि (प्रशा)/आगुवि/२०२५ दिनांक :- २०/०९/२०२

-: का र्या ल यी न आ दे श :-

विषय :- स्वागत कक्ष कर्तव्यावरील अंमलदारांकरीता सुचना
संदर्भ :- का.आ.क्र. ३१/पोसहआ/आगुवि/२०२४, दिनांक १५/०३/२०२४

आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे येणारे अभ्यागत यांचेसंदर्भात मा. वरिष्ठांनी उपरोक्त संदर्भान्वये यापुर्वी सुचना दिलेल्या आहेत. परंतू स्वागत कक्ष येथे नेमण्यात आलेल्या अंमलदा यांचेकडून आदेशामध्ये नमुद केलेल्या बाबी/सुचनांप्रमाणे अंमलबजावणी केली जात नसल्याचे मा वरिष्ठांच्या निदर्शनास आले असून सदरची बाब ही अत्यंत गंभीर आहे. याकरीता स्वागत कक्ष कर्तव्यावरील अंमलदार यांना खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

1) प्रथम सत्र स्वागत कक्ष कर्तव्यावरील पोलीस अंमलदार सकाळी ०९.०० वा कर्तव्यावर हजर होवू वपोनि/प्रशासन यांना त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९७६५३९२९४८ यावर संपर्क करतील. तसेच द्वितीय सत्र कर्तव्यावरील अंमलदार हे १५.३० वा हजर होवून वपोनि/प्रशासन यांना संपर्क करतील तसेच द्वितीय सत्र कर्तव्यावरील अंमलदार हे मा. वरिष्ठ अधिकारी कार्यालयात असे पर्यं कर्तव्यावर हजर राहतील.

2) वरिष्ठ कार्यालयास भेट देणाऱ्या अभ्यागताना मा. वरिष्ठांनी भेटीची वेळ (Appointment) दिली असल्यास, संबंधीत कार्यालयातील स्वीय सहायक/वाचक अधिकारी यांचेकडून खात्री करूनच अभ्यागतांना कार्यालयात जाण्याची परवानगी द्यावी.

3) कार्यालयात भेटीस येणारे अभ्यागत स्वागत कक्ष येथील नोंदवहीत खोटी माहिती देत असल्या निदर्शनास आल्याने स्वागत कक्ष कर्तव्यावरील अंमलदार यांनी भेटीस येणाऱ्या अभ्यागताचे त्यांचेसोबत आलेल्या सर्वांचे ओळखपत्र तपासुन खात्री करावी. तसेच सर्वांची नावे ओळखपत्राची माहिती, भ्रमणध्वनी क्रमांक, कार्यालयात आल्याची वेळ, भेटण्याकरीता आलेल्या संबंधीत कक्ष/ कार्यालयातील अधिकाऱ्याचे नाव, अर्ज/प्राथमिक चौकशी/गुन्ह्यांबाबतची माहिती स्वच्छ अक्षरात अभ्यागत नोंदवहीमध्ये नोंद करतील व त्यासमोर अभ्यागताची स्वाक्षरी घेतील (अभ्यागताचे नावानंतर +१, +२, +३ असे लिहू नये.)

4) भेटीकरीता आलेल्या अभ्यागताकडे आर्थिक गुन्हे कक्ष/कार्यालयातून पाठविलेल्या पत्राची खात्री करून पत्रातील संबंधीत चौकशी/तपासी अधिकारी यांना सदरबाबत पुर्वसुचना द्यावी व संबंधी कक्ष/कार्यालयातील अंमलदारास स्वागत कक्ष येथे बोलावून नमूद अंमलदारासोबत अभ्यागतांना कार्यालयात सोडण्यात यावे.

5) अभ्यागतांना मा. वरिष्ठांनी भेटीची वेळ (Appointment) दिली नसल्यास किंवा त्यांचेकडील अधिकारी यांनी बोलावल्याचे पत्र नसल्यास त्यांना कार्यालयात प्रवेश देण्यात येवू नये.

स्वागत कक्ष कर्तव्यावर नेमणुक केलेले अंमलदार यांनी कर्तव्यावर सतर्क राहून वर नमूद केलेल्या सुचनांप्रमाणे अंमलबजावणी/कार्यवाही करावी. स्वागत कक्ष कर्तव्यात हलगर्जीपणा केल्या दिसुन आल्यास संबंधीत अंमलदार यांचा कसुरी अहवाल मा. वरिष्ठांना सादर करण्यात येईल.

माहितीचा अधिकार
माहितीचा अधिकार अधिनियम २००५
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई
दिनांक २०/१/२६

(रमेश चांदिवडे)
प्रभारी पोलीस निरीक्षक (प्रशासन)
आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई

CamScanner